ePaper

**"पुन्हा 'एपिक फ्युरी' करू"; डोनाल्ड ट्रम्प यांची इराणला थेट लष्करी हल्ल्याची धमकी**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 25 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

थेरगावात नैसर्गिक नाल्याचा प्रवाह बदलल्याचा आरोप

## मराठा समाजाचे आंदोलन संपविण्यासाठी मोठे षडयंत्र; मनोज जरांगे आक्रमक

# 500 कोटींच्या विषयात मोदींनी लक्ष द्यावे!

**महाईन्यूज । मुंबई**

मराठा आरक्षणाच्या ५०० कोटींच्या कथित आर्थिक ऑफर आणि व्हायरल ऑडिओ क्लिपवरून पेटलेला राजकीय वाद दिवसेंदिवस अधिक तीव्र स्वरूप धारण करत आहे. शनिवारी (२४ ऑक्टोबर) अंकुशनगर येथील निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सत्ताधाऱ्यांवर राजकीय बॉम्ब टाकला. "मराठा समाजाचे हक्काचे आंदोलन बदनाम करून कायमचे बंद पाडण्यासाठीच हे ५०० कोटींचे कटकारस्थान रचले गेले होते. आम्ही याचा पडदा आता पूर्णपणे फाडून टाकला असून, हा ५०० कोटींचा विषय आम्ही कोणत्याही परिस्थितीत संपू देणार नाही," असा थेट इशारा त्यांनी दिला. तसेच या गंभीर षडयंत्राची पाळेमुळे खणून काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह आता थेट देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही यात तात्काळ लक्ष घालावे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.



## प्रसाद लाड, रामदास कदमांना थेट आवाहन अन् अटकेच्या मागणीवर सावध पवित्रा

भाजप आमदार प्रसाद लाड यांच्यावर निशाणा साधताना जरांगे म्हणाले की, "प्रसाद लाड यांनी आता पळवाट शोधू नये; आपल्या मैत्रीचा पश्चात्ताप होईल अशी वेळ त्यांनी आणू नये आणि या ऑडिओ क्लिपच्या मुळाशी जाऊन सत्य बाहेर काढावे." तसेच उदय सामंत व रामदास कदम यांच्या संशयास्पद वक्तव्यांचीही मुख्यमंत्र्यांनी विचारणा करावी, असे ते म्हणाले. दरम्यान, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शिंदे पिता-पुत्रांना अटक करण्याची मागणी केल्याबाबत विचारले असता, जरांगे यांनी कोणतीही घाई न करता अत्यंत सावध पवित्रा घेतला. "आरोपांवरून लगेच कुणाला अटक करू नका; आधी निष्पक्ष तपास होऊ द्या, सत्य बाहेर येऊ द्या आणि चौकशीच्या निष्कर्षांवरच कारवाई ठरवा," असे सांगत त्यांनी तपासाला प्राधान्य दिले.

## उदय सामंत किंवा शंभूराज देसाईंना चर्चेला पाठवा

या प्रकरणाच्या मुळाशी जाण्यासाठी फडणवीस आणि शिंदेंनी स्वतः जबाबदारी स्वीकारून संबंधितांची कसून चौकशी करावी, असे आव्हान जरांगेंनी दिले. "संबंधित संशयित तुमच्याच पक्षातील असले, तरी त्यांना पाठीशी घालू नका. उद्योगमंत्री उदय सामंत, शंभूराज देसाई किंवा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यापैकी कोणालाही चर्चेसाठी पाठवा, कोण पडद्यामागून काय करत आहे याची सर्व गोपनीय माहिती आम्ही त्यांना देऊ," असे ते म्हणाले. मात्र, ही सर्व माहिती देण्यापूर्वी संबंधित व्यक्तींच्या आणि साक्षीदारांच्या जीविताला कोणताही धोका होणार नाही, अशी लेखी व जाहीर हमी फडणवीस आणि शिंदे यांनी माध्यमांसमोर द्यावी, अशी महत्त्वाची अट त्यांनी ठेवली.

## जरांगे पाटलांचे प्रमुख ५ राजकीय इशारे

- **महिनाभर घडामोडींवर लक्ष:** पुढील महिनाभर सरकार आणि तपास यंत्रणा या प्रकरणात काय पावले उचलतात, यावर आम्ही बारकाईने लक्ष ठेवून आहोत.
- **जनप्रबोधन व सतर्कता:** राजकारण्यांच्या भूलथापांवर समाजाने तातडीने विश्वास ठेवू नये; मराठा समाजाने अंतर्गत फूट टाळून जागरूक राहावे.
- **सत्य दाबण्याचा प्रयत्न खपवून घेणार नाही:** दिल्लीत जाऊन ऑडिओ क्लिप खोटी ठरवण्याचा किंवा प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न झाल्यास जनता माफ करणार नाही.
- **साक्षीदारांची सुरक्षा सर्वतोपरी:** माहिती देणाऱ्यांना धोका निर्माण होणार नाही, याची राज्य शासनाने जाहीर खात्री द्यावी.
- **पक्षापेक्षा समाजाची अस्मिता मोठी:** सत्ताधारी नेत्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना वाचवण्यापेक्षा मराठा समाजाच्या अस्मितेचा आदर करावा.

## "आंदोलन मोडून काढण्यासाठीच एवढी टोकाची भूमिका का?"

पत्रकार परिषदेत संताप व्यक्त करताना जरांगे म्हणाले, "आम्हाला कोणत्याही नेत्यांशी राजकीय दावे-प्रतिदावे करण्यात अजिबात रस नाही. मात्र, मराठा आरक्षणासह दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे ज्वलंत प्रश्न रस्त्यावर मांडल्यामुळेच आमच्याविरोधात एवढ्या टोकाची भूमिका घेऊन आम्हाला ५०० कोटी रुपये देण्याचा आणि बदनाम करण्याचा प्रयत्न का झाला, याचे उत्तर जनतेला मिळालेच पाहिजे." या प्रकरणातील सत्य बाहेर येण्याऐवजी ते दडपण्यासाठी दिल्ली दरबारी पडद्यामागून राजकीय हालचाली सुरू असल्याचा संशयही त्यांनी यावेळी व्यक्त केला. फडणवीस आणि शिंदे यांच्या पक्षातील लोक जर त्यांच्या परस्पर असे कारनामे करत असतील, तर ते भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांसाठी आत्मघातकी ठरेल, असा धोक्याचा इशारा त्यांनी दिला.

# 'सोमेश्वर'च्या सभासदांची दिवाळी गोड

## कामगारांसाठी बोनस, वेतनवाढीचा फरक आणि दिवाळीभेटीचा निर्णय

**महाईन्यूज । पुणे**

**सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने सन २०२५-२०२६च्या गाळप हंगामातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या ऊसदरापोटी उर्वरित रक्कम तसेच सभासदांच्या ठेवीवरील व्याजाची रक्कम बँक खात्यांवर वर्ग केली आहे. याशिवाय कारखान्याच्या कायम व हंगामी कामगारांना १५ टक्के बोनस ॲडव्हान्स, रोजंदारी आणि ट्रेनी कामगारांना दिवाळीभेट, वेतनवाढीच्या फरकाचा पहिला हप्ता आणि रजेचा पगार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सभासद शेतकरी आणि कामगारांची दिवाळी गोड होणार आहे.**




उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याने ऊस उत्पादकांना सर्वोच्च ऊसदर जाहीर केला होता. त्यानुसार कार्यक्षेत्रातील सभासद आणि बिगरसभासद शेतकऱ्यांच्या नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या महिन्यांत तुटणाऱ्या उसासाठी प्रतिटन ३ हजार ८०० रुपये, फेब्रुवारीमध्ये तुटणाऱ्या उसासाठी प्रतिटन ३ हजार ९०० रुपये, तर मार्चमध्ये तुटणाऱ्या उसासाठी प्रतिटन ४ हजार रुपये ऊसदर जाहीर करण्यात आला होता. कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादकांसाठी प्रतिटन ३ हजार ४०० रुपये अंतिम ऊसदर निश्चित करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना यापूर्वीच प्रतिटन ३ हजार ३०० रुपये पहिली उचल आणि अनुदानाची रक्कम बँक खात्यांवर वर्ग करण्यात आली आहे.

आता सभासद व बिगरसभासद ऊस उत्पादकांना उर्वरित प्रतिटन ५०० रुपयांप्रमाणे एकूण ६०.११ कोटी रुपये, तर कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादकांना प्रतिटन १०० रुपयांप्रमाणे ९६ लाख रुपये बँक खात्यांवर वर्ग करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र यादव यांनी दिली. कारखान्याने सन २०२०-२०२१ मध्ये प्रतिटन २०० रुपयांप्रमाणे कपात केलेली ठेव रक्कम व त्यावरील व्याज असे एकूण २४.१५ कोटी रुपये सभासदांच्या बँक खात्यांवर वर्ग केले आहेत. तसेच, सन २०२३-२०२४ मधील ठेवींवरील व्याजापोटी ४.०० कोटी रुपयेही वितरित करण्यात आले आहेत. कारखान्याच्या कायम व हंगामी कामगारांसाठी १५ टक्के बोनस ॲडव्हान्सपोटी ३.३३ कोटी रुपये, तर रोजंदारी आणि ट्रेनी कामगारांना प्रत्येकी ८,५०० रुपयांप्रमाणे दिवाळीभेट म्हणून २९.०० लाख रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय, कामगारांच्या वेतनवाढीच्या फरकाचा पहिला हप्ता म्हणून १.८४ कोटी रुपये आणि रजेच्या पगारापोटी २८.०० लाख रुपये देण्यात येणार आहेत.

### १२ ते १२.५० लाख टन गाळपाचे उद्दिष्ट

कारखान्याचा सन २०२६-२०२७ चा गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू झाला आहे. आजअखेर ६१ हजार ५२० मेट्रिक टन उसाचे गाळप झाले असून, ५४ हजार ३५० क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. चालू गाळप हंगामासाठी कार्यक्षेत्रात ३८ हजार ५०० एकर क्षेत्रावर ऊस लागवड झाली असून, त्यातून अंदाजे १२ ते १२.५० लाख मेट्रिक टन ऊस गाळपासाठी उपलब्ध होण्याचा अंदाज आहे. हंगाम सुरळीत पार पाडण्यासाठी गतवर्षीप्रमाणेच सर्व सभासदांनी सहकार्य करावे, असे आवाहन कार्यकारी संचालक यादव यांनी केले.

# पंतप्रधानांना वेळ मिळेना, अन् हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो धावेना; कॉंग्रेसची टीका

**महाईन्यूज । पुणे**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो च्या उदघाटनासाठी वेळ मिळत नाही त्यामुळे या मार्गावर मेट्रो धावत नाही, हा प्रकार संतापजनक आणि निषेधार्ह आहे, अशी टीका माजी आमदार आणि प्रदेश कॉंग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी केली आहे.**



### हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सेवा तातडीने सुरू करावी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन व्हावे, यासाठी भाजपकडून मेट्रो सेवा सुरू करण्यास विलंब केला जात असल्याचा आरोप जोशी यांनी केला आहे. यामुळे पुणेकरांच्या कररूपाने जमा होणाऱ्या पैशांचा अपव्यय होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. यापूर्वी पुण्यातील दोन मेट्रो मार्गांचे चार-पाच वेळा उद्घाटन झाल्याचा उल्लेख करत, हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोबाबतही असाच प्रकार होत असल्याची टीका त्यांनी केली. पंतप्रधान मोदी यांनी उद्घाटनाचा कार्यक्रम जरूर करावा, मात्र त्यासाठी प्रवासी सेवा रोखून धरू नये, असे जोशी म्हणाले. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

हिंजवडी आयटी पार्कमध्ये वाहतूक कोंडी होते. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो धावू लागल्यावर सध्या होत असलेली कोंडी थोडीतरी कमी होईल, अशा अपेक्षेत आयटी कर्मचारी आणि नागरिकांना आहे. आता हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे बहुतांश काम झाले आहे. या मेट्रोच्या १७ स्थानकांना मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांची परवानगी तीन महिन्यांपूर्वीच मिळालेली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गावर प्रवाशांशिवायच मेट्रो धावते आहे.

हा प्रकार पुणेकरांच्या सहनशक्तीचा अंत पहाणारा आणि कर रूपाने जमा होणाऱ्या पुणेकरांच्या पैशांचा अपव्यय करणारा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या मार्गाचे उदघाटन करून मिरवून घ्यायचे आहे. याकरीता भाजपने या मार्गावरची मेट्रो सेवाच अडवून धरली आहे. मेट्रो मार्ग बांधणाऱ्या पुणे महानगर प्रदेश विकास महानगर (पीएमआरडीए) चे प्रशासनही भाजपपुढे हतबल झाले आहे.

पुण्यातील दोन मेट्रो मार्गांचे चार-पाच वेळा उद्घाटन करून पंतप्रधान मोदी यांनी स्वतःला मिरवून घेतले. तसाच प्रकार त्यांना हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो बाबत त्यांना करायचा आहे. पंतप्रधान मोदी यांनी जरूर मिरवून घ्यावे, उद्घाटनाचा डामडौल करावा. पण, तातडीने मेट्रो सेवा सुरू करावी, अशी मागणी जोशी यांनी केली आहे.

हिंजवडी आयटी पार्कमध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे आयटी कर्मचारी आणि नागरिक त्रस्त आहेत. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुरू झाल्यानंतर वाहतूक कोंडी काही प्रमाणात कमी होईल, अशी अपेक्षा आहे. या मेट्रो मार्गाचे बहुतांश काम पूर्ण झाले असून, १७ स्थानकांना तीन महिन्यांपूर्वीच मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांची परवानगी मिळाली आहे. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून या मार्गावर प्रवाशांविना मेट्रो धावत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे मेट्रो सेवा सुरू होण्यास होत असलेल्या विलंबाबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

# थेरगावात नैसर्गिक नाल्याचा प्रवाह बदलल्याचा आरोप

## सर्व्हे क्रमांक २७ मधील गृहप्रकल्पावर अजिंक्य बारणे यांचे आक्षेप; बफर झोनच्या नियमाचे उल्लंघन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात नियम धाब्यावर बसवून नैसर्गिक नाले व ओढे बुजवून बांधकाम तसेच, गृहप्रकल्प उभे केले जात आहेत. पावसाळ्यात पाण्यास वाट न मिळाल्याने ते पाणी थेट आजूबाजूच्या लोकवस्तीत शिरत असल्याचे प्रकार वाढले आहेत. त्याचा फटका रहिवाशांसह सदनिकाधारकांना बसत आहे. नियम धाब्यावर बसवून नैसर्गिक नाल्याचा प्रवाह बदल्याचा प्रकार थेरगाव येथील सर्व्हे क्रमांक 27 येथे झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.**



नाल्याच्या दोन्ही बाजूंना 6 मीटरचा बफर झोन सोडणे बंधनकारक असताना, या नियमाचे उघडपणे उल्लंघन करण्यात आले आहे. महापालिकेच्या ड्रेनेज विभागाने यापूर्वीच पत्राद्वारे धोक्याचा इशारा दिला असतानाही, महापालिकेच्या बांधकाम व स्थापत्य विभागाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत बांधकाम परवानगी दिल्याचा गंभीर आरोप वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य अजिंक्य बारणे यांनी केला आहे.

थेरगावमधील सर्व्हे क्रमांक 27 मधून एक मोठा नैसर्गिक नाला वाहतो. कोणत्याही नैसर्गिक जलस्रोताचा प्रवाह बदलणे किंवा त्यावर बांधकाम करणे कायद्याने गुन्हा आहे. महापालिकेच्या ड्रेनेज विभागाने या जागेची पाहणी करून लेखी पत्र दिले होते. नाल्याचा मूळ मार्ग बदलला, तर भविष्यात या परिसरात तीव्र पुराचा धोका निर्माण होऊ शकतो. नाल्याचा प्रवाह बदलल्यामुळे किंवा तो अरुंद केल्यामुळे नाल्याची पाणी वाहून नेण्याची क्षमता प्रचंड प्रमाणात कमी होईल.

पावसाळ्यात आजूबाजूच्या परिसरात पाणी शिरून मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे नियमानुसार नाल्याच्या दोन्ही बाजूंना सहा मीटरचा बफर झोन ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, मात्र ड्रेनेज विभागाच्या या तांत्रिक अभ्यासाला व इशाऱ्याला बांधकाम व स्थापत्य विभागाकडून केराची टोपली दाखवण्यात आली. त्या जागेत एक जुनी विहीर अस्तित्वात आहे. नैसर्गिक पाण्याचा स्रोत जिवंत असतानाही, ती विहीर थेट गृहप्रकल्पाच्या पार्किंगच्या भागात समाविष्ट केली आहे. विहिरीच्या जागेवरच पार्किंगचे स्लॅब टाकून त्यावर गृहप्रकल्प उभा केला जात आहे. नैसर्गिक अशा प्रकारे बांधकाम करणे तांत्रिकदृष्ट्या अत्यंत धोकादायक मानले जाते. भविष्यात जमिनीची धूप होऊन किंवा पाण्याच्या दबावामुळे पार्किंगचा भाग खचण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या बेकायदा बांधकामामुळे भविष्यात या गृहप्रकल्पामध्ये राहण्यास येणाऱ्या निष्पाप नागरिकांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात नाला भरल्यास संपूर्ण सोसायटी परिसर पाण्याखाली जाण्याची भीती आहे. विहिरीवरील इमारतीचा पाया कमकुवत होऊन मोठी दुर्घटना घडू शकते, असे वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य अजिंक्य बारणे यांनी सांगितले. थेरगाव सर्व्हे क्रमांक 27 मधील जागेतील नैसर्गिक नाल्याचा प्रवाह बदलण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य कार्यकारी अभियंत्याकडून अहवाल दिला आहे. त्यानुसार, महापालिका आयुक्तांनी नाल्याचा प्रवाह बदलण्यास मंजुरी दिली.

तसेच, त्या जागेतील विहिरदेखील तशीच ठेवून तिचे पुनरुज्जीवन करण्यात आलेले आहे. नाल्याच्या बाजूलादेखील 6 मीटर अंतर ठेवल्यानंतर बांधकाम परवानगी मंजूर केली आहे, असे महापालिकेचे सहशहर अभियंता सुनील भागवानी यांनी सांगितले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून बांधकाम परवानगी देताना सर्व नियमांचे पालन झाले आहे की नाही, याची तपासणी करण्याची मागणी केली जात आहे. तसेच, नाल्याचा प्रवाह बदलण्यास मंजुरी देताना सादर करण्यात आलेल्या तांत्रिक अहवालाचीही पडताळणी होणे आवश्यक आहे. संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी करून नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहाचे आणि विहिरीच्या अस्तित्वाचे संरक्षण केले जात आहे का, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. महापालिका प्रशासन या गंभीर तक्रारीवर काय भूमिका घेते आणि भविष्यातील संभाव्य धोके टाळण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### सदनिकाधारकांचा जीव धोक्यात

या जागेची तत्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत पुर्नतपासणी आणि मोजणी करण्यात यावी, ड्रेनेज विभागाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणाऱ्या बांधकाम परवानगी देणाऱ्या स्थापत्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची व विकासकाची चौकशी व्हावी. नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करून हे नियमबाह्य बांधकाम तात्काळ थांबवून दिलेली मंजुरी रद्द करण्यात यावी.

# चाकणमध्ये ७८ किलोमीटरच्या रस्त्यांच्या एकात्मिक विकासाचे नियोजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चाकण औद्योगिक क्षेत्रातील सुमारे ७८ किलोमीटरच्या रस्त्यांच्या एकात्मिक विकासाचे नियोजन करण्यात येत आहे. यामध्ये रस्त्यांची दुरुस्ती व सुधारणा, पावसाळी पाण्याचा निचरा, पथदिवे, पदपथ, वाहनतळ, उपयोगिता सेवांसाठी मार्गिका आणि रस्ते सुरक्षेशी संबंधित कामांचा समावेश आहे. उद्योजकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रशासन आणि उद्योग प्रतिनिधींनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा.**



औद्योगिक विकासाला पूरक पायाभूत सुविधा, सुरक्षित वाहतूक व्यवस्था आणि आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. चाकण औद्योगिक क्षेत्रातील समस्यांबाबत डुडी यांच्या अध्यक्षतेखाली उद्योजकांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत त्यांनी विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधून औद्योगिक क्षेत्रातील सद्यस्थिती, अडचणी आणि आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेतला. तसेच आगामी एक ते दोन वर्षांत प्रस्तावित असलेल्या विकासकामांची माहिती देऊन या कामांच्या अंमलबजावणीत उद्योगांकडून अपेक्षित सहकार्याबाबत चर्चा केली.

नैसर्गिक नाले, ओढे आणि पाण्याच्या प्रवाहांचे मार्ग अतिक्रमणांमुळे बाधित झाल्याने पावसाळ्यात पाणी साचणे आणि पूरस्थिती निर्माण होण्याच्या समस्या उद्भवतात. त्यामुळे संबंधित क्षेत्राचे सर्वेक्षण करून अनधिकृत अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. ज्या ठिकाणी सक्षम प्राधिकरणांकडून बांधकाम परवानग्या देण्यात आल्या आहेत, त्या प्रकरणांची तपासणी करून मंजूर आराखडे आणि लागू कायद्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला.

या ठिकाणी दररोज सुमारे चार ते पाच लाख लोकांची ये-जा होत असल्याने वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण येतो. या पार्श्वभूमीवर कंपन्यांनी त्यांच्या मालवाहतूक कंत्राटदारांना, ट्रकचालकांना आणि कर्मचाऱ्यांना वाहने सार्वजनिक रस्त्यांवर उभी न करण्याच्या सूचना द्याव्यात. एमआयडीसीच्या निश्चित वाहनतळांवर किंवा संबंधित कंपनीच्या आवारात वाहनांची व्यवस्था करावी. वाहनतळांचे योग्य व्यवस्थापन आणि वाहतुकीचे शिस्तबद्ध नियोजन केल्यास रस्त्यांवरील अडथळे कमी होण्यास मदत होईल, असे डुडी यांनी स्पष्ट केले.

### उन्नत मार्गिकेमुळे संपर्क अधिक सुलभ

कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या कामांच्या पाळ्यांच्या वेळांमध्ये टप्प्याटप्प्याने बदल करण्याची शक्यता तपासावी. त्यामुळे गर्दीच्या वेळेतील वाहतुकीवरील ताण कमी होऊ शकतो. तसेच नाशिक फाटा ते राजगुरुनगर प्रस्तावित उन्नत मार्गिकेमुळे औद्योगिक वाहतूक अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली.



## भूमिका

**श्रद्धा, राजकीय विचार आणि राष्ट्राची संकल्पना... या तिन्ही गोष्टी एकाच शब्दात बांधल्या की चर्चा गोंधळते. भारतातील सार्वजनिक चर्चेत 'हिंदू धर्म', 'हिंदुत्व' आणि 'हिंदूराष्ट्र' हे शब्द अनेकदा एकमेकांच्या जागी वापरले जातात. मात्र त्यांचे अर्थ, इतिहास आणि परिणाम वेगवेगळे आहेत. हे फरक समजून घेणे म्हणजे श्रद्धेचा अपमान करणे नव्हे; विचारांची अचूक चिकित्सा करणे होय.**

# हिंदू धर्म, हिंदुत्व आणि हिंदूराष्ट्र




हिंदू धर्मात उपासना, तत्त्वज्ञान, धार्मिक आचार, सण आणि विविध प्रादेशिक परंपरांचा समावेश होतो. शैव, वैष्णव, शाक्त आणि इतर संप्रदायांमध्ये श्रद्धा व आचारांची विविधता आहे. ईश्वर, आत्मा, मोक्ष आणि उपासनेविषयीही एकच सर्वमान्य भूमिका आढळत नाही. म्हणून हिंदू धर्म समजून घेताना त्यातील अंतर्गत मतभेद आणि विविधता लक्षात घ्यावी लागते.

एखादी व्यक्ती मंदिरात जाते, वारकरी परंपरा मानते किंवा घरातील धार्मिक विधी पाळते, यावरून तिची राजकीय भूमिका ठरत नाही. धार्मिक आचरण आणि राजकीय बांधिलकी यांचा संबंध असू शकतो; पण दोन्ही एकच आहेत, असे गृहीत धरता येत नाही. हिंदुत्वाच्या आधुनिक वैचारिक मांडणीत विनायक दामोदर सावरकरांचा ESSENTIALS OF HINDUTVA हा १९२३ मधील ग्रंथ महत्त्वाचा आहे. सावरकर स्वतः हिंदुत्व आणि हिंदू धर्म यांत फरक करतात. त्यांच्या मांडणीत हिंदुत्वाचा आवाका धार्मिक श्रद्धेपेक्षा व्यापक असून त्यात सामायिक इतिहास, संस्कृती आणि राष्ट्रीय ओळख यांचा समावेश होतो.

सावरकरांच्या व्याख्येत भारताला 'पितृभूमी' आणि 'पुण्यभूमी' मानण्याला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे त्यांच्या चौकटीतील 'हिंदू' ही ओळख केवळ कोणत्या देवाची पूजा केली जाते, यावर ठरत नाही. त्याच वेळी भारताबाहेर पवित्र स्थाने असलेल्या मुस्लिम आणि ख्रिश्चन समुदायांच्या समावेशाचा प्रश्न या व्याख्येत निर्माण होतो. हा मुद्दा सावरकरांच्या मूळ लेखनात स्पष्टपणे येतो.

येथे एक महत्त्वाचा फरक लक्षात घ्यावा: एखाद्या विचारवंताची 'हिंदू कोण?' ही व्याख्या म्हणजे भारतीय नागरिकत्वाची कायदेशीर व्याख्या नव्हे. सांस्कृतिक ओळखीच्या दाव्याची आणि नागरिकांच्या अधिकारांची चर्चा स्वतंत्रपणे करावी लागते.

महत्त्वाचे म्हणजे, देशातील सध्याची सामाजिक व राजकीय स्थिती पाहात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) किंवा भारतीय जनता पार्टी (BJP) ज्यापद्धतीने गेल्या 10-15 वर्षांत हिंदुत्वाची मांडणी करीत आहे, ती त्याचे आराध्य असलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना अभिप्रेत आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. हिंदूराष्ट्र ही भारताच्या राष्ट्रीय ओळखीला हिंदू संस्कृती किंवा सभ्यतेशी जोडणारी संकल्पना आहे. मात्र तिच्या समर्थकांकडूनही तिचे अर्थ वेगवेगळ्या पद्धतीने मांडले जातात. म्हणून कोणी हिंदूराष्ट्र म्हणते तेव्हा त्याचा अर्थ सांस्कृतिक राष्ट्र आहे, धार्मिक राज्य आहे की शासनव्यवस्थेतील बदल आहे, हे विचारणे आवश्यक ठरते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी २५ ऑक्टोबर २०२० च्या विजयादशमी भाषणात हिंदूराष्ट्र म्हणताना संघाच्या मनात राजकीय किंवा सत्ताकेंद्रित संकल्पना नसल्याचे सांगितले. संघाच्या या स्वतःच्या स्पष्टीकरणाची नोंद घेऊनच त्याच्या भूमिकेची चर्चा केली पाहिजे. तरीही प्रश्न उरतो: या सांस्कृतिक चौकटीत स्वतःला 'हिंदू' न मानणाऱ्या नागरिकांचे स्थान काय? त्यांना स्वतःची स्वतंत्र धार्मिक आणि सांस्कृतिक ओळख राखून समान नागरिक म्हणून जगता येईल का? हे प्रश्न विचारणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे; राष्ट्रकल्पनेचे परिणाम तपासणे होय. हिंदुत्वाच्या एखाद्या राजकीय भूमिकेवर टीका केली म्हणजे हिंदू धर्मातील प्रत्येक श्रद्धेवर टीका केली, असा निष्कर्ष चुकीचा ठरेल. त्याचप्रमाणे प्रत्येक धार्मिक हिंदू हिंदूराष्ट्राच्या विशिष्ट आराखड्याचा समर्थक आहे, असेही म्हणता येणार नाही.

## प्रासंगिक »

# अनोखा पाहुणा

**एका गावात माधव नावाचा कुंभार राहत होता. त्याच्या घराजवळ एक लहानसे मोकळे अंगण होते. एके दिवशी तिथे अनोळखी पक्षी जखमी अवस्थेत पडलेला त्याला दिसला. माधवने त्याला पाणी दिले आणि सुरक्षित जागी ठेवले.**

काही दिवसांनी पक्षी बरा झाला. माधवला त्याच्याशी लळा लागला होता; पण त्याने पक्ष्याला पिंजऱ्यात ठेवण्याऐवजी मुक्त करण्याचा निर्णय घेतला. पक्षी आकाशात उडून गेला.

काही महिन्यांनी माधवच्या घराला अचानक आग लागली. गावकऱ्यांनी धावपळ करून आग विझवली; मात्र त्याच्या अंगणातील मातीची भांडी फुटली आणि मोठे नुकसान झाले. माधव निराश होऊन बसला.

दुसऱ्या दिवशी गावातील एका व्यापाऱ्याने त्याची भांडी पाहिली आणि त्याला मोठी मागणी दिली. माधवच्या उत्कृष्ट कामाची माहिती दूरवर पोहोचली होती. त्याचा व्यवसाय पुन्हा उभा राहिला.

माधवला जाणवले की संकटानंतरही नव्या संधी निर्माण होऊ शकतात. त्याने पुन्हा मेहनतीने काम सुरू केले आणि काही काळात व्यवसाय पूर्वीपेक्षा अधिक वाढवला.

**- तात्पर्य : संकटामुळे वाट बंद झाली, तरी नव्या संधींचे दरवाजे उघडू शकतात.**

**टेस्ला कंपनीने ऑटोमोबाईल क्षेत्रात एक ऐतिहासिक आणि थक्क करणारी कामगिरी केली आहे. दीर्घ प्रतिक्षेनंतर, टेस्लाने आपल्या बहुप्रतिक्षित 'रोडस्टर' सुपरकारचे नवीन प्रोटोटाइप अमेरिकेतील टेक्सास स्पेस एक्स रॉकेट चाचणी केंद्रावर लोकांसमोर सादर केले.**

# टेस्लाची उडणारी कार पाहून जग थक्क!




या कार्यक्रमादरम्यान टेस्लाने चक्क एक कार हवेत उडवून दाखवली, ज्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरला आहे. विशेष म्हणजे, या कारमध्ये पारंपरिक इंजिनाऐवजी रॉकेट विज्ञानाचा वापर करण्यात आला असून, 2028 पर्यंत याचे प्रत्यक्ष उत्पादन सुरू होईल अशी घोषणा करण्यात आली आहे.

याविशेष अनावरण सोहळ्यात टेस्लाने कोणतीही पारंपरिक पद्धत न वापरता थेट इलेक्ट्रिक रोडस्टर कार हवेत झेपावताना दाखवली. एअरोस्पेस आणि रॉकेट तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेल्या या वाहनाने सर्वांनाच आपल्या कामगिरीने थक्क करून सोडले. स्पेसएक्सच्या अभियंत्यांनी या कारमध्ये विशेष एअर थ्रस्टर्स आणि शोषण प्रणाली बसवली आहे. एका रॅम्पवरून धावताना या कारने हवेत एक उलटी कोलांटी मारली, पुन्हा स्वत:ला सावरले आणि थ्रस्टर्सच्या जोरावर सुरक्षितपणे जमिनीवर आली. या कारच्या उडण्यामागे आणि कसरतींमागे अत्यंत प्रगत विज्ञान काम करत आहे. वाहनाच्या तळाशी फॅन-आधारित विशेष सक्शन प्रणाली आहे. यामुळे कार रॅम्पवर अगदी उलटी असतानाही घसरत नाही. रॉकेटप्रमाणे ही कार नियंत्रित करण्यासाठी यात डझनभर नोझल्स आणि मागील बाजूस थ्रस्टर्स देण्यात आले आहेत. यात प्रत्येकी 600 लिटर क्षमतेच्या दोन अति-उच्च दाबाच्या टँकमध्ये सुमारे 250 किलो हवा असते. ही हवा 10 नोझल्सद्वारे बाहेर टाकली जाते, ज्यामुळे कारला हवेत उचलणे शक्य होते. या कारच्या कामगिरीबाबत एलॉन मस्क यांनी दावा केला आहे की, ही कार अवघ्या 1 सेकंदापेक्षा कमी वेळेत 0 ते 60 मैल प्रति तास (सुमारे 96 किमी/तास) इतका प्रचंड वेग पकडू शकते. तसेच, या सुपरकारचा कमाल वेग 230 मैल प्रति तास (370 किमी/तास) पेक्षा जास्त आहे.

15 ऑक्टोबर 2026 रोजी अमेरिकेतील टेक्सास राज्यातील स्पेसएक्सच्या रॉकेट डेव्हलपमेंट आणि टेस्टिंग सेंटरमध्ये हे प्रात्यक्षिक पार पडले. यावेळी रोडस्टर 2 ने मोठ्या वक्राकार रॅम्पवर उलट्या दिशेने प्रवास केला, हवेत पलटी घेतली आणि काही क्षण हवेत राहिल्यानंतर सुरक्षितपणे खाली उतरली. टेस्लाचे सीईओ एलॉन मस्क यांनी या कामगिरीनंतर समाधान व्यक्त केले. कंपनीच्या व्हेईकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख लार्स मोरावी यांनीही या टेक्नोलॉजीला उडणाऱ्या कारच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे म्हंटले आहे. प्रात्यक्षिकात कारने कंपनीच्या इतर वाहनांच्या वरून झेप घेत सायबरट्रकच्या वर हवेत तरंगल्याचेही दाखवण्यात आले. पण या कामगिरीचे प्रत्यक्ष रस्त्यावरील वापरात रूपांतर करण्यासाठी आणखी चाचण्या आणि तांत्रिक पडताळणी महत्त्वाची असेल.

## ।। अभंगवाणी ।।



मान अपमान गोवे ।
अवघे गुंडूनी ठेवावे ॥१॥

हें चि देवाचें दर्शन ।
सदा राहे समाधान ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ५०० कोटींच्या आरोपावरून महायुतीत वादंग

## जरांगे यांनी सादर केलेल्या ५०० कोटींच्या कथित ध्वनिफितीवरून महायुतीत वाद

महाईन्यूज । मुंबई

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी जालन्यातील पत्रकार परिषदेत सादर केलेल्या ध्वनिफितीवरून सत्ताधारी महायुतीमध्ये तणाव निर्माण झाला. भाजपाला सोबत घेऊन एकनाथ शिंदे यांना संपवण्याचा जरांगे यांचा कट आहे का? असा सवाल शिंदेसेनेतील एका नेत्याने उपस्थित केला. त्यावर देवेंद्र फडणवीस यांना राजकीयदृष्ट्या संपवण्यासाठी जरांगे यांना कोण ताकद पुरवत होते हे जाहीर करायचे का? असे प्रत्युत्तर भाजपाच्या नेत्याने दिले. या आरोप प्रत्यारोपांच्या फेरीत मुख्यमंत्री फडणवीसांनी या कथित ध्वनिफितीची न्यायवैद्यक तपासणी करण्याचे आदेश दिले.**

मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत एक ध्वनिफित सादर केली. त्यामध्ये तीन-चार व्यक्तींमध्ये महत्वाचे संभाषण सुरू असल्याचे समजते. सदरील ध्वनिफित ही २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वीची असल्याचे सांगितले जाते. त्यावेळी जरांगे यांच्या आंदोलनामुळे मराठवाड्यात सत्ताविरोधी लाट होती. लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना याची प्रचितीही आली होती. त्यावेळी जरांगे यांना शांत राहण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी ५०० कोटी रुपये दिल्याचा उल्लेख या ध्वनिफितीत आहे. यावरून जरांगे पाटील प्रचंड आक्रमक झाल्याने नवा राजकीय वादंग निर्माण झाला. विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले. दुसरीकडे भाजपाच्या काही नेत्यांनी या ध्वनिफितीच्या सत्यतेबाबत शंका उपस्थित केली. त्याचवेळी जरांगे पाटील यांनी आपण कोणतेही पैसे स्वीकारले नसल्याचे ठामपणे सांगितले.

नागपूरमध्ये माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कथित ध्वनिफितीची न्यायवैद्यक चौकशी केली जाणार असल्याची घोषणा केली. तसेच अडीच वर्षांनंतरच ही ध्वनिफित समोर का आली, यामागचा नेमका हेतू काय आणि कोणाला लक्ष्य केले जात आहे? याचा सखोल तपास केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यादरम्यान शिंदेसेनेचे नेते रामदास कदम यांनी जाहीर पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणासाठी थेट भाजपालाच जबाबदार धरले. एकनाथ शिंदे यांची लोकप्रियता वाढत असल्यामुळे भाजपामधील काही लोक त्यांना खाली खेचण्याचा करण्याचा प्रयत्न करत आहेत का? शिंदे यांना राजकीयदृष्ट्या संपवण्याचा प्रयत्न भाजपामध्ये कोण करत आहे? महायुतीतील मित्रपक्षाच्या विरोधात कोण काम करतंय? याचे उत्तर भाजपाला द्यावे लागेल, अशी टीका त्यांनी केली. त्याचवेळी कदम यांनी भाजपाने नेते प्रसाद लाड आणि मनोज जरांगे पाटील हे एकत्र जेवण करताना काही छायाचित्रेही माध्यमांसमोर सादर केली.

भाजपाच्या काही नेत्यांशी जरांगे-पाटील यांच्या असलेल्या संबंधांवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. या प्रकरणात त्यांनी भाजपाचे विधान परिषद सदस्य प्रवीण दरेकर यांचेही नाव घेतले. या प्रकरणाच्या चौकशीची मागणी करणारे पत्र आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांना लिहिल्याचेही कदम यांनी सांगितले. दुसरीकडे हे प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे म्हणत शिंदेसेनेचे नेते आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनीही ध्वनिफितीतील संभाषणात भाजपाशी संबंधित व्यक्ती असल्याचा आरोप केला. तसेच या प्रकरणाची सत्यता पडताळणीसाठी संबंधित व्यक्तींच्या आवाजाचे नमुने प्रयोगशाळेत तपासण्याची मागणी त्यांनी केली. मराठा समाजाच्या आंदोलनाला एकनाथ शिंदे यांनी प्रभावीपणे हाताळले आणि त्यांना न्याय मिळवून देण्याच्या मागणीला सातत्याने पाठिंबा दिला. त्यामुळेच शिंदे यांची बदनामीचा कट रचण्यासाठी ही ध्वनिफित तयार करण्यात आल्याचे सामंत यांनी कोल्हापूरमध्ये माध्यमांना सांगितले.



### तेव्हापासून शिंदे महायुतीत नाराज

दरम्यान भाजपाच्या काही नेत्यांनी हा वाद दीर्घकाळ परिणाम करणारा ठरणार नसल्याचे सांगितले. मात्र, यामुळे महायुतीच्या प्रतिमेला धक्का बसू शकतो आणि कदम यांच्या वक्तव्यांमुळे भाजपा-शिंदेसेनेत दरी निर्माण होऊ शकते, अशी शक्यताही त्यांनी बोलून दाखवली. २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपदावरून दूर राहावे लागले. तेव्हापासून शिंदे हे महायुतीत नाराज असल्याची चर्चा आहे.

### प्रसाद लाड यांचे रामदास कदम यांच्या टीकेला प्रत्युत्तर

शिंदेसेनेच्या नेत्यांनी केलेल्या या आरोपांना भाजपानेही जोरदार प्रत्युत्तर दिले. "रामदास कदम भाजपावर आरोप करणार असतील, तर ते आम्ही खपवून घेणार नाही. त्यांच्या आक्रमक भूमिकेला प्रत्युत्तर कसे द्यायचे हे आम्हाला ठाऊक आहे. आपण सरकारचा आणि महायुतीचा भाग आहोत हे त्यांनी समजून घेतले पाहिजे. महायुतीत राहायचे आणि आपल्याच मित्रपक्षावर हल्ला करायचा हे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत बसत नाही," असे भाजपाचे नेते प्रवीण दरेकर म्हणाले. आम्ही मित्रपक्ष म्हणून एकत्र सत्तेत आहोत. एकनाथ शिंदे यांना राजकीयदृष्ट्या संपवायचा प्रयत्न भाजपा का करेल? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. तसेच शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांना भाजपानेच पाठिंबा दिला होता. आम्हाला त्यांचे राजकीय नुकसान करायचे असते तर त्यावेळीच केले असते. भाजपा कट रचत असल्याचा आरोप करून उगाच आमच्या पक्षाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणार असाल, तर आम्ही गप्प बसणार नाही, असा इशाराही दरेकर यांनी दिला. भाजपाचे आमदार प्रसाद लाड यांनीही रामदास कदम यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. महायुतीमध्ये फूट पाडू शकतील, अशी वक्तव्ये करण्यापासून त्यांनी कदम यांना सावध केले. दुसरीकडे मनोज जरांगे-पाटील यांनीही रामदास कदम यांना खडेबोल सुनावले.

# मुंबईतील जैश-ए-मोहम्मदशी संबंध असलेल्या रॅपिडो रायडरला एटीसकडून अटक

महाईन्यूज । मुंबई

**पाकिस्तानमधील दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी संबंध असल्याच्या संशयावरून महाराष्ट्र दहशतवादीविरोधी पथकाने (एटीएस) शनिवारी माहीम येथील एका ३३ वर्षीय व्यक्तीला अटक केली. पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या संपर्कात आल्याचा संशय व्यक्त करत या पैलूचा तपास केला जात आहे. एएनआय वृत्तसंस्थेने एक्सवर याबाबतची माहिती दिली.**




अटक केलेल्या आरोपीचे नाव मोहम्मद हसन अबू सरमद अख्तर असल्याचे एएनआयच्या एक्स पोस्टमध्ये नमूद करण्यात आलेले आहे. दहशतवादीविरोधी पथकाच्या माहितीनुसार, आरोपीच्या मोबाइल फोनची तपासणी केली असता त्यात जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अझरच्या प्रक्षोभक सोशल मीडिया पोस्ट आणि ऑडिओ क्लिप्स आढळून आल्या आहेत.

आरोपीच्या सोशल मीडियावरील हालचाली आणि एका टेलिग्राम ग्रुपमुळे हे प्रकरण उघडकीस आले. दहशतवादीविरोधी पथकाच्या काळाचौकी युनिटने भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १९६ (१) अंतर्गत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

तपास अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, संशयित आरोपी रॅपिडो रायडर आणि परफ्यूम विक्रेता म्हणून काम करण्याच्या आड कट्टर विचारसरणीचा प्रसार करत होता. महाराष्ट्र एटीएसने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी एक टेलिग्राम ग्रुप चालवत होता. १ जून रोजी या ग्रुपवर त्याने मसूद अझरचे बाबरी मशीद आणि इतर विषयांवरील प्रक्षोभक भाषणे अपलोड केली होती.

# भारत-चीनमध्ये वारंवार तणाव

## चीन अरुणाचल प्रदेशवर वारंवार दावा का करतो, नकाशावरील नावे बदलण्यामागे चीनचे राजकारण

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अरुणाचल प्रदेशात भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये अद्यापही चकमकी होत असल्याचे वृत्त समोर आल्यानंतर परराष्ट्र मंत्रालयाने शुक्रवारी यावर स्पष्टीकरण दिले. सीमावर्ती भागात चिनी सैनिकांनी नेहमीच्या गस्तीच्या मार्गात बदल करून वेगळ्या हालचाली केल्यास दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये तणाव निर्माण होतो, असे मंत्रालयाने सांगितले. अरुणाचल प्रदेशातील अनेक भागात भारतीय जवानांचा चिनी सैन्याशी आजही संघर्ष होत असल्याचा खुलासा इंडो-तिबेटियन बॉर्डर पोलीसचे (ITBP) महासंचालक शत्रूजीत कपूर यांनी गुरुवारी केला होता.**

द इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, चिनी सैन्याने जुलै २०२६ पासून अरुणाचल प्रदेशातील 'अप्पर सुबनसिरी' जिल्ह्यातील असाफिला आणि ताक्सिंग भागाजवळ भारतीय जवानांशी वारंवार वाद घातला आहे. या भागात दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये अनेकदा चकमकीसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. याशिवाय चिनी सैन्याने प्रत्यक्ष सीमारेषेपासून अवघ्या ६ ते ७ किलोमीटर अंतरावर तंबू ठोकल्याचेही सांगितले जात आहे.

अरुणाचल प्रदेशच्या सीमेवरील अनेक ठिकाणी भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये आमनेसामने येण्याच्या घटना सुरू असल्याची माहिती आयटीबीपीच्या प्रमुखांनी दिली. मात्र, संरक्षण क्षेत्रातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या भागात कोणत्याही हिंसक चकमकी झाल्याचे वृत्त नाही. दरम्यान आयटीबीचे महासंचालक शत्रुजीत कपूर यांच्या या विधानावरून देशांतर्गत राजकीय वातावरण चांगलेच तापले. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी याच मुद्द्याला हाताशी धरून सत्ताधारी भाजपाला लक्ष्य केले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबाबत तातडीने स्पष्टीकरण द्यावे अशी मागणीही त्यांनी केली. सीमेवरील घडामोडी अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगत खरगे यांनी राष्ट्रीय सुरक्षा, चीनसोबतचे आर्थिक संबंध आणि दोन्ही देशांदरम्यान वारंवार होणाऱ्या राजनैतिक चर्चांमधून नेमके काय साध्य झाले असा रोखठोक सवाल सरकारला विचारला.




### चीनच्या कुरापतींना भारताचे प्रत्युत्तर

चीनच्या या कुरापतींना प्रत्युत्तर म्हणून भारताने ऑगस्ट महिन्यात आपल्या अधिकृत नकाशावर अरुणाचल प्रदेशातील २७ ठिकाणे आणि भौगोलिक वैशिष्ट्यांची अधिकृत नोंद केली. या यादीत सीमावर्ती भागातील लोंगजू गावाचाही समावेश आहे. १९५९ पासून या गावावर चीनचे नियंत्रण आहे. मात्र, भारताच्या दाव्यानुसार हे गाव भारतीय हद्दीत येते. अरुणाचल प्रदेशातील २७ ठिकाणांची भारतीय सर्वेक्षण विभागाच्या अधिकृत नकाशावर नोंद करण्यामागे त्यांची अचूक ओळख निश्चित करणे आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्याबाबत जागरूकता वाढवणे हा उद्देश असल्याचे केंद्रीय गृह मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे.

### अरुणाचल प्रदेशावर चीनचा दावा

भारताच्या ताब्यात असलेल्या अरुणाचल प्रदेशावर चीनकडून वारंवार दावा सांगितला जातो. या प्रदेशाला चीन झांगनान तसेच दक्षिण तिबेट असे संबोधतो. मात्र भारताने त्यांचा हा दावा वारंवार फेटाळून लावला आहे. अरुणाचल हा भारताचा 'अविभाज्य भाग' असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने ठामपणे सांगितले आहे. अरुणाचल प्रदेशावरील आपला दावा सिद्ध करण्यासाठी चीनच्या नागरी व्यवहार मंत्रालयाकडून २०१७ पासून या राज्यातील विविध ठिकाणांना चिनी नावे देण्याची प्रक्रिया राबवली जात आहे. या नामांतराची ताजी यादी त्यांनी नुकतीच एप्रिल महिन्यात प्रसिद्ध केली होती.

## "पुन्हा 'एपिक फ्युरी' करू"; डोनाल्ड ट्रम्प यांची इराणला थेट लष्करी हल्ल्याची धमकी

**महाईन्यूज । फ्लोरिडा**

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत अणुकार्यक्रमाला मर्यादा घालण्याबाबत राजनैतिक करार न झाल्यास, इराणविरुद्ध पुन्हा एकदा लष्करी कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. शुक्रवारी फ्लोरिडा येथील एका निवडणूक प्रचार रॅलीत बोलताना त्यांनी त्यांच्या पूर्वीच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या निर्णयांचा उल्लेख केला आणि इराणच्या नेतृत्वावर टीका केली.**



फॉक्स न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार ट्रम्प म्हणाले, "ते करार करण्यास तयार नाही झाले तर आम्ही आणखी एक छोटी 'एपिक फ्युरी' करू शकतो. जर ते हुशार असतील, तर ते म्हणतील की 'चला, कामाला लागूया.' पण मला शंका आहे की ते असे (करार करतील) करतील, कारण कदाचित ते हुशार नाहीत."

यापूर्वी फेब्रुवारी महिन्यात अमेरिकेच्या लष्कर आणि इस्रायलने संयुक्तपणे 'ऑपरेशन एपिक फ्युरी' अंतर्गत इराणवर हल्ले केले होते. या हल्ल्यांमध्ये इराणचे माजी सर्वोच्च नेते आयतौल्ला अली खामेनी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य मारले गेले होते. यापूर्वीच्या लष्करी कारवाईचा संदर्भ देत ट्रम्प म्हणाले, "आम्ही 'ऑपरेशन मिडनाईट हॅमर' द्वारे इराणची युरेनियम समृद्ध करण्याची क्षमता पूर्णपणे नष्ट केली. आम्ही त्यांचा लष्करी, आर्थिक आणि इतर सर्वच आघाड्यांवर पराभव केला आहे आणि आता आम्ही हे काम पूर्णत्वास नेण्याची खात्री करत आहोत."

अमेरिकेच्या एका राजनैतिक अधिकाऱ्याने इराणवर लवकरच नवे हल्ले होऊ शकतात असे संकेत दिल्यानंतर ट्रम्प यांचे हे वक्तव्य आले आहे. यापूर्वी जेव्हा ट्रम्प यांना अशा संभाव्य कारवाईबद्दल विचारण्यात आले होते, तेव्हा त्यांनी अशा कोणत्याही योजनेची आपल्याला माहिती नसल्याचे म्हटले होते.

परंतु, ट्रम्प अजूनही राजनैतिक तोडग्यासाठी तयार असल्याचे बॅराक यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, "अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. ते करारासाठी तयार आणि उपलब्ध आहेत आणि आम्ही अनेक महिन्यांपासून चर्चेच्या टेबलवर आहोत." बॅराक हे सध्या सिरियासाठी अमेरिकेचे मुख्य प्रतिनिधी म्हणून काम पाहत आहेत, मात्र इराणच्या धोरणात त्यांची थेट भूमिका नाही.

### या वीकेंडला हल्ला होण्याची शक्यता - अमेरिकेचे राजदूत

तुर्कीमधील अमेरिकेचे राजदूत टॉम बॅराक यांनी शुक्रवारी सांगितले की, इराणवर या वीकेंडलाच (शनिवार-रविवार) हल्ला होऊ शकतो. खाडी देशांच्या दौऱ्यावर असताना पॉडकास्ट होस्ट मारिओ नॉफाल यांना दिलेल्या मुलाखतीत बॅराक म्हणाले, "या वीकेंडला हल्ला होऊ शकतो का? तर नक्कीच होऊ शकतो."

# तो येतोय..! ‘बागुलबुवा’ मराठीतील पहिला AI चित्रपट

मराठी चित्रपटसृष्टीत पाहिल्यांदाच एआयच्या माध्यमातून ‘बागुलबुवा’ या मराठी चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. मराठी चित्रपटाने तंत्रज्ञानात झालेले बदल स्वीकारून आजवरची वाटचाल सुरू केली. आता आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या काळातही हे तंत्रज्ञान आत्मसात करून मराठी चित्रपटाची भव्यता वाढवली आहे.

या चित्रपटाचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे खरे कलाकार घेऊन एआयच्या माध्यमातून हा चित्रपट तयार करण्यात आला असून असा नाविन्यपूर्ण प्रयोग करून थिएटरमध्ये प्रदर्शित होणारा हा पहिलाच चित्रपट आहे. बागुलबुवा या चित्रपटाचे टायटल टीजर सोशल मीडियाद्वारे लाँच करण्यात आला असून हॉलिवूडसारखा भासणारा हा टायटल टीजर आहे.

एस एस फिल्म्स प्रॉडक्शनने चित्रपटाची निर्मिती केली असून शरद पाटील, अंजली पाटील हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. अभिनेता, दिग्दर्शक चेतन चावडा यांनी या चित्रपटाचं कथालेखन




आणि दिग्दर्शन केले असून नितिन चव्हाण यांनी पटकथा लेखन, विनोद राजे यांनी संकलन, अथर्व चव्हाण यांनी व्हीएफएक्स, आकाश पांडे यांनी स्टोरीबोर्ड केला आहे. मेटाफेक्स प्रोडक्शनने या चित्रपटाच्या एआयचे काम पाहिले आहे.

आदिती द्रविड यांनी लिहिलेल्या गीतांना गीत साई पियूष यांचे संगीत लाभले आहे. अभिनेता अभिजीत खांडकेकर या चित्रपटात झळकणार असून अन्य ५५ दमदार कलाकारांची नावे अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आली आहेत. याशिवाय या चित्रपटात आणखी एक सरप्राइज पाहायला मिळणार असून त्याबाबत कोणतीही माहिती दिली नसल्याने चित्रपटाबाबतची चाहत्यांची उत्सुकता अधिक वाढली आहे.

या चित्रपटातील कथानक पुणे आणि परिसरात घडत असल्याचं दिसतं. अचानक एक संकट येत आणि त्याच्याकडे पाहिल्यावर डोळे बिघडतात अशी स्थिती होते. संकट म्हणून आलेला हा ‘बागुलबुवा’ म्हणजे नेमकं काय आहे याचं उत्तर चित्रपटातूनच मिळणार आहे.



# टॉम हॉलंडच्या चित्रपटात सबरीना कारपेंटर

सोनी पिक्चर्सच्या आगामी फ्रेड एस्टेयर बायोपिकमध्ये आता ‘द सब्सटेंस’ स्टार मागरिट क्वाली आणि ग्रॅमी विजेता सबरीना कारपेंटरची एंट्री झाली आहे. या चित्रपटाचे नाव अद्याप निश्चित करण्यात आलेले नाहच. चित्रपटात टॉम हॉलंड हा फ्रेड एस्टेयरची व्यक्तिरेखा साकारणार आहे. तर मागरिट ही त्याची बहिण आणि प्रारंभिक डान्स पार्टनर एडेल एस्टेयरच्या भूमिकेत दिसेल. सबरीना यात फ्रेड एस्टेरची प्रसिद्ध ऑन स्क्रीन डान्स पार्टनर जिंजर रोजर्सची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन पॉल किंग करणार आहे आणि याच्या निर्मितीची जबाबदारी एमी पास्कल सांभाळत आहे. पॉल किंगने स्टीवन्स लेवेंसनसोबत मिण्tन या चित्रपटाची कहाणी लिहिली आहे. हा चित्रपट कॅथलिन रिले यांचे पुस्तक ‘द एस्टेयर्स : फ्रेड अँड एडेल’वर आधारित आहे. फ्रेड आणि एडेल एस्टेयरने ब्रॉडवे आणि लंडनच्या वेस्ट एंडवर डान्स जोडी म्हणून नाव कमाविले होते. यानंतर फ्रेड एस्टेयर चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध म्युझिक स्टार झाला. खासकरून जिंजर रोजर्ससोबत त्याची जोडी लोकांच्या पसंतीस पडली. दोघांनी ‘द गे डिवोर्सी’, ‘टॉप हॅट’ आणि ‘स्विंग टाइम’ यासारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले.फ्रेड एस्टेयरने स्वत:च्या सुमारे 7 दशके लांब कारकीर्दीत 30 हून अधिक सांगितिक चित्रपटांमध्ये काम केले. याचबरोबर त्याने ब्रॉडवे आणि वेस्ट एंडवरही स्वत:ची ओळख निर्माण केली. जिंजर रोजर्ससोबत त्याची जोडी आजही चित्रपटांमधील प्रसिद्ध डान्स जोड्यांपैकी एक मानली जाते. टॉम हॉलंड सुमारे 5 वर्षांपासून या चित्रपटात फ्रेड एस्टेयरची भूमिका साकारण्यासाठी तयारी करत आहे. तो या चित्रपटाचा निर्माता म्हणूनही काम करणार आहे.

# ‘सूर्या’ चित्रपटात प्रज्ञा



बॉलिवूड अभिनेता सनी देओल स्वत:चा आगामी चित्रपट ‘सूर्या : अंत से आरंभ तक’मध्ये एका नव्या अवतारात दिसून येणार आहे. अभिनेत्याने याचे पोस्टर जारी केले आहे. फर्स्ट लुक पोस्टरमध्ये तो अत्यंत गंभीर आणि आक्रमक शैलीत दिसून येत आहे. पोस्टरमध्ये सनी वृद्ध भूमिकेत दिसून येत असून यात तो धूम्रपान करत असून त्याचा लुक आक्रमक आहे. ‘भूतकाळ अन् वर्तमानात गुंतलेल्या सत्याचा तो शोध घेतो’ अशी कॅप्शन देत सनीने हा चित्रपट 20 नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार असल्याचे सांगितले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन मल्याळम फिल्ममेकर एम. पद्मकुमार यांनी केले आहे. हा त्यांचा पहिला हिंदी चित्रपट आहे. 2018 मध्ये प्रदर्शित प्रसिद्ध मल्याळी चित्रपट ‘जोसेफ’चा हा हिंदी रिमेक आहे. सनी देओल यात एक निवृत्त पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहे. यात तो एका अशा तपासात अडकून पडतो, ज्यामुळे त्याला गुन्हे अन् स्वत:च्या भूतकाळातील रहस्यांना सामोरे जावे लागते. चित्रपटात न्याय, नैतिक दुविधा आणि कधीच समोर न आलेल्या सत्याचे परिणम यासारख्या विषयांना दाखविण्यात आले आहे. या चित्रपटात प्रज्ञा जायस्वाल देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहे. तिच्यासोबत रवि किशन, जिस्शू सेनगुप्ता, टीनू आनंद, मनीष वाधवा आणि तनुश्री चक्रवर्ती, रोहित तिवारी आणि अनूप त्रिवेदी हे कलाकार दिसून येतील. या चित्रपटाची निर्मिती दीपक मुकुट, हेमंत मुकुट आणि लोकेश मुकुट यांनी एमएम मूव्हीज बॅनर अंतर्गत केली आहे.

# भारताचा न्यूझीलंड संघावर रोमांचक विजय!

## तिलक वर्मा ठरला टीम इंडियाच्या विजयाचा टर्निंग पॉईंट; मालिकेत २-० ने आघाडी

**महाईन्यूज । हॅंग्ली ओव्हल**

**भारताने न्यूझीलंड संघावर दुसऱ्या टी-२० सामन्यात ४ विकेट्सने रोमांचक विजय मिळवला. तिलक वर्माने न्यूझीलंड संघाच्या जबड्यातून विजय हिसकावून घेतला. अखेरच्या षटकांमध्ये हैदराबादचे असलेले दोन्ही फलंदाज तिलक वर्मा व नितीश रेड्डी भारताला विजय मिळवून देत माघारी परतले.**




दुसऱ्या टी-२० सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि यजमान संघाला १८० धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात भारताने सावध सुरूवात केली, पण संघाचे टॉप-५ फलंदाज स्वस्तात माघारी परतले, याचा संघाला मोठा धक्का बसला. फिनिशरच्या भूमिकेत असलेल्या नमन धीरने संघाचा डाव सावरत ३१ धावा केल्या, पण मिचेल सँटनरने त्याला बाद करत संघाला मोठा धक्का दिला. केवळ ७० धावांत ५ बळी गमावल्यानंतरही, उपकर्णधार तिलक वर्माच्या शानदार अर्धशतकाच्या बळावर भारताने एक चेंडू शिल्लक असतानाच विजयाचे लक्ष्य गाठलं; यासह भारताने ४ गडी राखून विजय मिळवला आणि मालिकेत २-० अशी आघाडी घेतली.

अखेरच्या षटकात भारताला ११ धावांची गरज असताना नितीश रेड्डीने १ धाव घेत तिलकला स्ट्राईक दिली. त्याने दुसऱ्याच चेंडूवर चौकार खेचला, यानंतर तिलकने तिसऱ्या चेंडूवर दोन धावा घेतल्या. यासह त्याने आपलं २६ चेंडूत अर्धशतक झळकावलं. यानंतर पुढच्या चेंडूवर तिलकने १ धाव घेत नितीशने स्ट्राईक घेतली. त्याच्या पुढचा चेंडू डफीने वाईड टाकला. यासह भारताला २ चेंडूत २ धावांची गरज होती.

न्यूझीलंड संघाने दिलेल्या १८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात काहीशी संथ झाली, परंतु त्यानंतर संजू सॅमसन आणि अभिषेक यांनी धावांचा वेग वाढवला. मात्र, पाचव्या षटकात संजू सॅमसन बाद झाला आणि त्यानंतर संघाने विकेट्स गमावल्या. वैभव सूर्यवंशीही प्रभावी कामगिरी करू शकला नाही, तर कर्णधार श्रेयस अय्यरही स्वस्तात बाद झाला. धावसंख्या ७० वर असताना भारताच्या ५ विकेट्स पडल्या होत्या, ज्यापैकी तीन विकेट्स किवी कर्णधार मिचेल सँटनरने घेतल्या होत्या.

नमन धीरने ३१ धावांची आक्रमक खेळी करत भारतीय संघाला पुन्हा सामन्यात परत आणलं, परंतु अखेर सँटनरने त्याला बाद केलं, सँटनरने या सामन्यात ४ विकेट्स घेत न्यूझीलंड संघाच्या दिशेने सामना फिरवला होता, पण तिलक वर्मा व नितीश रेड्डीच्या जोडीने भारताच्या विजयाची जबाबदारी स्वीकारत अगदी योग्य रितीने पार पाडली. १५ व्या षटकात ११२ धावा असताना नमन बाद झाला; त्यानंतर उपकर्णधार तिलक वर्मा (५१) आणि नितीश कुमार रेड्डी (२६) यांनी संघाला विजयाच्या जवळ नेलं. शेवटच्या षटकात भारताला ११ धावांची गरज होती. तिलक वर्मा आणि नितीश यांनी अवघ्या ५ चेंडूंमध्ये या ११ धावा पूर्ण करून संघाला विजय मिळवून दिला.

हॅंगली ओव्हलवर पुन्हा एकदा नाणेफेक हरल्यानंतर न्यूझीलंड संघाला प्रथम फलंदाजी करावी लागली. मात्र, मागील सामन्याच्या तुलनेत खेळपट्टी वेगळी होती आणि त्याचा परिणाम स्पष्टपणे दिसून आला; पॉवरप्लेमध्येच न्यूझीलंडने आपले तीन प्रमुख फलंदाज गमावले होते आणि धावफलकावर केवळ ४१ धावा होत्या. अशा कठीण परिस्थितीत, ग्लेन फिलिप्स आणि बेव्हन जेकब्स यांनी डाव सावरला आणि ११६ धावांची दमदार भागीदारी रचली.

फिलिप्सने सलग दुसऱ्या सामन्यात अर्धशतक झळकावत सर्वाधिक ७० धावा केल्या, तर जेकॉब्सनेही (५८) अर्धशतक पूर्ण केलं. डावाच्या उत्तरार्धात मायकेल ब्रेसवेलने सलग दोन चेंडूंवर एक षटकार आणि एक चौकार मारून न्यूझीलंडला १८० धावांच्या एकूण धावसंख्येपर्यंत पोहोचवले. भारतीय संघासाठी अर्शदीप सिंग सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला, ज्याने ३३ धावा देऊन २ महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या.

## २०१८ मधील बॉल टेम्परिंग प्रकरणावर फाफ डु प्लेसिसचा स्मिथबाबत मोठा खुलासा

**महाईन्यूज । ऑस्ट्रेलिया**

**ऑस्ट्रेलियाचा संघ २०१८ मध्ये दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर असताना केपटाऊनच्या मैदानावर बॉल टेम्परिंग प्रकरण घडलं होतं. ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी चेंडू कुरतडल्याचा प्रकार घडला होता. हे प्रकरण कॅमेऱ्यात कैद झाल्यानंतर, ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंवर बंदी घालण्यात आली होती. त्यावेळी स्टीव्ह स्मिथ ऑस्ट्रेलियाचा कर्णधार होता. कर्णधार असल्यामुळे पत्रकार परिषदेत येऊन स्मिथने या प्रकरणाची जबाबदारी घेतली होती. याबाबत बोलताना आता दक्षिण आफ्रिकेचा माजी खेळाडू फाफ डू प्लेसिसने मोठा खुलासा केला आहे.**





क्रिकइन्फोवर बोलताना, “२०१८ मध्ये केपटाऊनच्या मैदानावर झालेल्या बॉल टेम्परिंग प्रकरणानंतर ज्यावेळी स्टीव्ह स्मिथ पत्रकार परिषदेत आला आणि त्याने या प्रकरणाची संपूर्ण जबाबदारी घेतली. त्यावेळी मी आश्चर्यचकीत झालो होतो. मी त्याला म्हणालो होतो की, तू का जबाबदारी घेतोय? तू काही चुकीचं केलेलं नाही. माध्यमांनी त्याच्यावर दबाव टाकला. सर्वकाही अचानक समोर आलं. माझ्यासोबतही असंच काही घडलं होतं.”

स्टीव्ह स्मिथवर बंदी घालण्यात आली होती. या कठीण काळात फाफ डू प्लेसिसने स्टीव्ह स्मिथला मेसेज करून धीर दिला होता. याबाबत बोलताना,फाफ डू प्लेसिस म्हणाला, “मी लिहिलं होतं की, तू ज्या कठीण काळातून जातोय, त्याचं मला खूप वाईट वाटतंय. तू हिंमत ठेव. एक आठवडा तूला खूप वेगळं वाटेल, पण नंतर सर्वकाही ठिक होईल. पण यातून बाहेर पडण्यासाठी त्याला एक वर्ष लागेल, हे आम्हाला माहीत नव्हतं. आम्ही त्याला हेच म्हटलं होतं की, आम्ही तुझ्यासोबत आहोत.”

### नेमकं काय घडलं होतं?

ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज बेनक्राफ्टने चेंडू कुरतडला होता. त्यामुळे गोलंदाजांना असमान उसळी मिळत होती. बेनक्राफ्ट चेंडू कुरतडत असल्याचं कॅमेऱ्यात कैद झालं होतं. त्यावेळी सामना थांबवण्यात आला. ही गोष्ट उपकर्णधार डेव्हिड वॉर्नरला माहीत होती. या प्रकरणानंतर स्मिथचं उपकर्णधारपद गेलं होतं. यासह बेनक्राफ्ट आणि डेव्हिड वॉर्नरवरही बंदी घालण्यात आली होती.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। रविवार ।
दि. 25 ऑक्टोबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## एक लाख रुपये रोख पारितोषिक, स्मृतीचिन्ह अन् भेटवस्तुचा मानकरी | महाराष्ट्रातील सर्वात मोठी रील स्पर्धेचा परितोषिक वितरण समारंभ दिमाखात

# विश्वविक्रमी सोहळ्याच्या रील स्पर्धेत मयूर अहेर ठरला ‘ब्लॉकब्लास्टर’ विजेता!

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वांत उंच स्मारक “स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण” आणि निर्माणाधीन भगवा धर्मध्वज यांना ढोल-ताशांच्या ऐतिहासिक विश्वविक्रमी मानवंदना सोहळ्याचे क्षण सर्जनशील रीलच्या माध्यमातून समाजमाध्यमांवर पोहोचविणाऱ्या रील निर्मात्यांच्या हिंदूभूषण स्मारक ट्रस्टतर्फे गौरव करण्यात आला. ट्रस्टतर्फे आयोजित खुल्या रील स्पर्धा-२०२६ मध्ये नाशिक येथील मयूर अहेर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना एक लाख रुपयांची रोख रक्कम, स्मृतीचिन्ह आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.**




आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून दि.४ ऑक्टोबर रोजी झालेल्या ऐतिहासिक मानवंदना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. त्याची नोंद गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली. त्या सोहळ्यानिमित्त आयोजित ‘ब्लॉकब्लास्टर रील’ स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहमेळावा शनिवारी (दि. २४ ऑक्टोबर) मोशी येथील सीझन्स बँक्वेट येथे पार पडला. यावेळी कामगार नेते सचिन लांडगे, उद्योजक कार्तिक लांडगे, हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे सदस्य प्रतापराव मोहिते, पृथ्वीराज लांडगे, सुहास ताम्हाणे आदी उपस्थित होते.

हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे सचिव प्रसाद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रासह अन्य राज्यातील ७५० हून अधिक रील निर्मात्यांनी सहभाग नोंदवला होता. यामुळे हा सोहळा जगभरात पोहाचला. त्यासोबतच महाराष्ट्रभरात शिव-शंभूप्रेमींनी सोशल मीडियावर तुफान प्रतिसाद दिला आहे. पारितोषिक वितरण समारंभाला ६०० हून अधिक स्पर्धत उपस्थित राहीले. त्यामुळे हा सोहळा अत्यंत दिमाखात संपन्न झाला. आमदार लांडगे यांनी सर्व पारितोषिक विजेत्या रिल निर्मात्यांचे अभिनंदन केले.

उद्योजक कार्तिक लांडगे म्हणाले की, “ घरातील आई आणि गोठ्यातील गाई माझ्यासाठी समान पूजनीय आहे” या भावनेतून आमदार महेश लांडगे काम करीत आहेत. देव-देश-धर्म आणि संस्कृती जपण्यासाठी प्रखर भूमिका आणि त्याला आयआयएम, सीईओपी, न्यायालय इमारत आणि संविधान भवन उभारणीसाठी त्यांनी यशस्वी पाठपुरावा केला. ‘विकासाभिमूख हिंदुत्वा’च्या या कार्यात सर्व रील निर्माते आणि नेटिझन्सची साथ द्यावी.

## पुरस्काराचे मानकरी...

या स्पर्धेत यश कदम यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. त्यांना ७५ हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. तृतीय क्रमांकाचे मानकरी जय गाडे यांना ५० हजार रुपये, चतुर्थ क्रमांक विजेत्या हिंदवी भोसले यांना २५ हजार रुपये, तर पाचवा क्रमांक मिळविणाऱ्या प्रणव यांना १० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. पहिल्या पाचही विजेत्यांना रोख रकमेसह स्मृतीचिन्ह आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या विजेत्यांना एकूण २ लाख ६० हजार रुपयांची रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच, सहभागी सर्व रिल निर्मात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

“ धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जगातील सर्वात उंच शिल्पाला ढोल-ताशा पथकांच्या मानवंदनेचा सोहळा जगभरात पोहोचवण्यासाठी रील निर्मात्यांनी पुढाकार घेतला. वास्तव आणि सत्य दाखवणारे रील स्टार खऱ्या अर्थाने ‘रिअल स्टार’ आहेत. सशक्त राष्ट्र आणि त्या राष्ट्रातील सशक्त तरुण घडवण्यासाठी, राष्ट्रभक्ती जागृत करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे.

- **महेश लांडगे**, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

“ ‘रीलस्टार’ म्हणजे उद्याचा भारत घडवणारे युवक आहेत. देव-देश-धर्म आणि संस्कृती जपण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. रील स्पर्धेमुळे शिव-शंभू विचार जगातील कानाकोपऱ्यात आणि नव्या पिढीपर्यंत पोहचणार आहेत. आता वारकरी सांप्रदायामध्ये पवित्र असलेली इंद्रायणी नदी प्रदूषण आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आम्ही “इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन”चे आयोजन करतो. या उपक्रमातही रील निर्मात्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.

- **सचिन लांडगे**, कामगार नेते.








# पथनाट्यातून स्वच्छतेचा जागर..!

## ताथवडेतील विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून दिला स्वच्छतेचा संदेश; नागरिकांमध्ये जनजागृती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**स्वच्छ शहराच्या निर्मितीसाठी नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ताथवडे येथील जिल्हा परिषद शाळेत पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांसह नागरिकांना कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, सार्वजनिक स्वच्छता आणि प्लास्टिकचा वापर टाळण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.**



महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून ताथवडे येथील जिल्हा परिषद शाळेत पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छतेविषयी प्रभावी संदेश दिला. ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे जमा करणे, रस्त्यावर कचरा न टाकणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे या विषयांवर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. स्वच्छ शहर घडविण्यासाठी प्रशासनाच्या प्रयत्नांसोबतच नागरिकांचा सक्रिय सहभागही तितकाच महत्त्वाचा असल्याचे या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच स्वच्छतेच्या सवयी रुजविणे आणि त्यांच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश घराघरांत पोहोचविणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या नियमांचे पालन केल्यास परिसर स्वच्छ ठेवण्यास मदत होते, याची जाणीवही विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

या उपक्रमाला 'ज' क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, सहाय्यक आरोग्य अधिकारी शांताराम माने आणि आरोग्य निरीक्षक कोमल फर्डे यांचे मार्गदर्शन लाभले.

स्वच्छता ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, आपल्या कचऱ्याचे ओला , सुका सॅनिटरी, विशेष काळजी योग्य कचरा अशा चार प्रकारे योग्य वर्गीकरण करून तो महापालिकेच्या घंटागाडीला देणे आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवणे या सवयी प्रत्येकाने अंगीकाराव्यात, असे आवाहन या जनजागृती उपक्रमातून यावेळी करण्यात आले.



स्वच्छ आणि सुंदर शहराची निर्मिती करण्यासाठी नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच स्वच्छतेच्या चांगल्या सवयी रुजविल्यास त्याचा सकारात्मक परिणाम कुटुंबावर आणि समाजावरही होतो. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि प्लास्टिकचा वापर टाळणे यांसारख्या सवयी प्रत्येकाने अंगीकाराव्यात. स्वच्छ शहर घडविण्यासाठी नागरिकांनी महापालिकेच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा.

**- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

## राष्ट्रीय एकता बाईक रॅलीचे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत जल्लोषात स्वागत

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राष्ट्रीय एकता, देशाची अखंडता आणि अंमली पदार्थांविरोधात जनजागृतीचा संदेश घेऊन दक्षिण भारतातून सुरू झालेल्या राष्ट्रीय एकता बाईक रॅलीचे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत उत्साहपूर्ण वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. रावेत येथील डी. वाय. पाटील महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित कार्यक्रमात ढोल-ताशांचा गजर, पुष्पवृष्टी आणि जल्लोषात विविध राज्यांतून आलेल्या बाईक रायडर्सचे स्वागत करण्यात आले.**



पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून राष्ट्रीय एकता, देशाची अखंडता, बंधुभाव आणि नशामुक्त भारताचा संदेश युवकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

राष्ट्रीय एकता बाईक रॅलीचे डी. वाय. पाटील महाविद्यालय, रावेत येथे आगमन होताच उपस्थितांनी ढोल-ताशांच्या गजरात रायडर्सचे स्वागत केले. बाईक रायडर्सवर पुष्पवृष्टी करून त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. या स्वागतामुळे संपूर्ण परिसरात राष्ट्रीय एकता आणि नशामुक्त भारताचा संदेश देणारे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या वतीने पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांच्या हस्ते विविध राज्यांतून आलेल्या बाईक रायडर्सना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या राष्ट्रीय एकता बाईक रॅलीमध्ये पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील तब्बल १०० बाईक रायडर्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाला पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) रोहिदास पवार, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-१) संदीप आटोळे, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-२) प्रदीप जाधव, पोलीस उपायुक्त (वाहतूक) विक्रांत देशमुख, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-२) सचिन कदम यांच्यासह अंमली पदार्थविरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार, विविध राज्यांतून आलेले बाईक रायडर्स आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून राष्ट्रीय एकता बाईक रॅलीला पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आले. दक्षिण भारतातून सुरू झालेली ही राष्ट्रीय एकता बाईक रॅली देशाच्या विविध भागांतून प्रवास करत असून, ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त केवडिया, एकतानगर येथे पोहोचणार आहे. राष्ट्रीय एकता, देशाची अखंडता आणि बंधुभावाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासोबतच युवा पिढीमध्ये अंमली पदार्थविरोधात जनजागृती करणे हा या रॅलीचा प्रमुख उद्देश आहे.

पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाला डी. वाय. पाटील महाविद्यालय, रावेत येथे मिळालेला उत्स्फूर्त आणि भव्य प्रतिसाद हा राष्ट्रीय एकता व नशामुक्त भारताच्या संदेशाला युवकांकडून मिळणाऱ्या सकारात्मक प्रतिसादाचे प्रतीक ठरला.

“अंमली पदार्थांना नाही, जीवनाला हो!” हा संदेश देत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने राष्ट्रीय एकता बाईक रॅलीतील सर्व रायडर्सना पुढील प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

# स्वच्छ ऊर्जा क्षेत्रांतील संधींचा शोध घ्या; संतोष खैरनार

## ‘टेडएक्स-पीसीयू २०२६’मध्ये विद्यार्थ्यांना नवकल्पना आणि तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**नव संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी जिज्ञासा, धैर्य, शिस्त आणि सातत्यपूर्ण विचारमंथन आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी प्रचलित चौकटींच्या पलीकडे जाऊन विचार करावा आणि स्वच्छ ऊर्जा व सेमीकंडक्टर यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांतील संधींचा शोध घ्यावा असे मार्गदर्शन कार्पोरेट क्षेत्रातील तज्ञ आयनॉक्स विंडचे अध्यक्ष संतोष खैरनार यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे ‘टेडएक्स – पीसीयू २०२६’ या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी खैरनार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पीसीयू चे कुलपती तथा पीसीईटी विश्वस्त हर्षवर्धन पाटील, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयू चे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सहभागी व्याख्याते व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी पुणे इंटरनॅशनल सेंटरचे उपसंचालक हृषिकेश धनाडे, पीसीयूचे इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड इंडस्ट्री रिलेशन्स विभागाचे संचालक डॉ. प्रणव चरखा, विद्यार्थी विकास व कल्याण विभागाच्या संचालिका डॉ. अंजू बाला, कॅप जेमिनी कंपनीचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी कार्यकारी उपाध्यक्ष मुकेश जैन, कृत्रिम बुद्धिमत्ता मार्गदर्शक सागर बाबर, मराठी स्टँड-अप कॉमेडियन सौरभ भोसले, ग्लोबल लीन चेंज एजंट आणि चेंज हॅकर सारिका खारबंदा, मारवाडी युनिव्हर्सिटी चे सहाय्यक प्रा. राहुल त्रिवेदी, मुंबई डबेवाला असोसिएशन अध्यक्ष सुभाष तळेकर, वरिष्ठ कृत्रिम बुद्धिमत्ता आर्किटेक्ट आरशद देवानी, एच आर तज्ञ पुलकित हांडा भारतीय माजी लष्कर अधिकारी चिन्मय महाले आदींनी ‘टेडेक्स पीसीयू २०२६’ कार्यक्रमात मार्गदर्शन केले.

पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड विद्यापीठाने टेड एक्सचे पहिल्यांदाच आयोजन केले होते. या कार्यक्रमात उद्योग क्षेत्रातील तज्ञ, नवोन्मेषक, शिक्षण तज्ञ यांनी अमूल्य मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि सकारात्मक परिवर्तनाची क्षमता सिद्ध करण्यासाठी अशा आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचा उपयोग होईल असे डॉ. देसाई म्हणाले.

पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे म्हणाले की, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवांच्या माध्यमातून शिकण्याच्या संधी पीसीयू उपलब्ध करून देते.




# चिंचवड येथील प्रतिभा ज्युनिअर कॉलेजमध्ये शारदोत्सव दिमाखात साजरा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ज्युनिअर कॉलेजमध्ये नवरात्रौत्सवानिमित्त ‘शारदोत्सव’ मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांच्या संयोजनाखाली या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात शारदामातेच्या प्रतिमेचे पूजन आणि मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.**




### स्पर्धेचा निकाल:

सांघिक गटात – प्रथम क्रमांक अकरावी वाणिज्य – ब , द्वितीय क्रमांक – अकरावी वाणिज्य – ड, तृतीय क्रमांक अकरावी विज्ञान – इ
युगुल गटात -प्रथम क्रमांक -कु. प्राजक्ता तावडे आणि कु. सृष्टी शिंदे (बारावी वाणिज्य) द्वितीय क्रमांक – कु. अंजली गुरुंग आणि कु. पूर्णा काशीलकर.
विजेत्या संघांना आणि युगुल विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

नवरात्रोत्सवाचे सांस्कृतिक महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने महाविद्यालयात आंतर-वर्गीय दांडिया नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. स्नेहा भाटिया आणि त्यांच्या टीमने या स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केले. विद्यार्थ्यांनी आकर्षक पारंपरिक वेशभूषा परिधान करून तालबद्ध दांडिया नृत्याचे सादरीकरण केले. ढोलच्या तालावर आणि पारंपरिक संगीतावर विद्यार्थ्यांनी धरलेल्या ठेक्याने संपूर्ण परिसर दणाणून गेला.या स्पर्धेचे परीक्षण प्रसिद्ध परीक्षक रौनक गांधी यांनी केले.

या उत्सवाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि सणांचे महत्त्व समजावून सांगणे तसेच शिक्षणाबरोबर त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देणे हा होता. अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जाणीव, सांघिक भावना, आत्मविश्वास आणि कलात्मक अभिव्यक्ती विकसित होण्यास मदत होते, असे मत प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांनी व्यक्त केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे संस्थापक , सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालक डॉ. तेजल शहा यांच्या प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळे हा शारदोत्सव आनंदात आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शारदामातेच्या आशीर्वादाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानप्राप्तीचा आणि यशाचा मार्ग अधिक उज्वल होवो, अशी सदिच्छा यावेळी व्यक्त करण्यात आली.


Who Needs
Bone Density
CheckUp ?
Women After 40s
Long Sitting Jobs
Previous Fractures
Long Term Steroids Use
People With Vitamin D Deficiency
Consult with our experts now!
020-67313000 / +91 98220 55986
Sainath Hospital, Sant Nagar, Sector no. 4, Moshi Pradhikaran, Pune - Nashik Highway, Pune 412105
SAINATH HOSPITAL
Assuring Quality Care
Center Of Excellence For Trauma & Joint Replacement Surgery
www.sainathhospital.com